# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/12/2023 (सोमवार) सकाळ

## सराईत गुन्हेगार प्रशांत उर्फ सोनु मुकेशसिंग सेंगर याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द
## (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत येणाऱ्या इंदोरा ता. मौदा जि. नागपूर परीसरात राहणारा सराईत गुन्हेगार प्रशांत उर्फ सोनु मुकेशसिंग सेंगर, वय ३४ वर्ष, रा. इंदोरा ता. मौदा जि. नागपूर हा मागील ५ वर्षापासून अरोली, इंदोरा या परिसरात गुंडगिरी करुन शरीराविरूद्ध व मालमत्तेविरूद्ध गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करुन दहशत पसरवित असतो. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचेविरुध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. परंतु प्रशांत उर्फ सोनु याचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु प्रशांत उर्फ सोनु याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. प्रशांत उर्फ सोनु याचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. १०/१२/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांनी सराईत गुन्हेगार प्रशांत उर्फ सोनु मुकेशसिंग सेंगर याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढुन त्यास १ वर्षाकरीता स्थानबध्द केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार व अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री ओमप्रकाश कोकाटे, पोलीस स्टेशन अरोली येथील ठाणेदार सहा. पोलीस निरीक्षक निशांत फुलेकर तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकुर, सहायक फौजदार सुरज परमार, पोलीस हवालदार निलेश बर्वे, पोलीस अंमलदार होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

## सराईत हातभट्टीवाला अरमानसिंग मानसिंग टाक याला MPDA कायदयांतर्गत ०१ वर्षाकरीता केले स्थानबध्द
## (स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई)

पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत येणाऱ्या बानोरचंद्र परीसरात राहणारा सराईत हातभट्टीवाला अरमानसिंग मानसिंग टाक वय ३३ वर्ष, रा. बानोरचंद्र हा मागील ०३ वर्षापासून जलालखेडा परिसरात गुंडगिरी करुन नागरिकांना त्रास देत होता. तो नेहमी गुन्हेगारी कृत्यात गुंतलेला असायचा जलालखेडा परिसरात मोहाफुलाची हातभट्टीने दारू काढुन विक्री करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असामाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करुन दहशत पसरवित असतो. नागपूर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरुध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवून त्याचेविरुध्द गुन्हे नोंद केले. परंतु अरमानसिंग याचे गुन्हेगारी प्रवृत्तीमध्ये सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु अरमानसिंग याने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरुच ठेवली. अरमानसिंग याचे कृत्य सामाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री हर्ष ए. पोद्दार यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीण कडुन MPDA कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दि. ०९/१२/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, नागपूर

यांनी सराईत हातभट्टीवाला अरमानसिंग मानसिंग टाक याचे विरुध्द स्थानबध्दता आदेश काढला त्यानुसार त्याला मध्यवर्ती कारागृह नागपूर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्द केले.

सदर कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए पोद्दार, व अपर पोलीस अधीक्षक, डॉ. संदीप पखाले यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक श्री. मनोज चौधरी तत्कालीन ठाणेदार पोलीस स्टेशन जलालखेडा तसेच स्थानिक गुन्हे शाखेतील सहायक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकुर, सहायक फौजदार सुरज परमार, पोलीस हवालदार निलेश बर्वे, पोलीस अंमलदार होमेश्वर वाईलकर यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**